# फरिस्ता

नारायण धारप

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**फरिस्ता : नारायण धारप**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये २१०/-

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ❍ फरिस्ता | ... | ५ |
| ❍ बंध विमोचन | ... | २५ |
| ❍ निर्यास | ... | ४७ |
| ❍ दुसरा प्रमाद | ... | ८० |
| ❍ जयदेव आणि उन्मार्गी! | ... | १२१ |
| ❍ जयदेव आणि पुतळा! | ... | १५३ |
| ❍ जयदेव आणि '–'! | ... | १८२ |

## फरिस्ता

ही वाट आणि ती वाट... सर्व वाटा सारख्याच असतात. त्या सर्वत्र जातात किंवा कोठेही जात नाही. काही जंगलातून जातात, काही वैराण वाळवंटातून, काही माळरानावरून, काही समुद्राच्या फेसाळणाऱ्या कडेने; मग तिच्याऐवजी हीच का निवडायची? कारण आहे... त्या वाटेवर प्रेम असतं, मायाममता असते, आपुलकीचा ओलावा असतो. त्या प्रवासाचं पाऊल आणि पाऊल सुखाचं असतं... पण वाटेवर जर प्रेम नसेल, जर फिकीर नसेल जर पाऊल पाऊल वेदनेचं असेल.. पावला-पावलागणिक तुम्ही आयुष्याच्या आणि दैवाच्या नावाने बोटं मोडत राहाल... आणि तरीही प्रवास थांबणारच नाही... वाटा संपणारच नाहीत... ही, नाहीतर दुसरी... नाहीतर तिसरी... पावलं पडत राहिली पाहिजेत, थांबून उपयोगाचं नाही.

✦

### एक

पहिली, सुरुवातीची भेट अगदीच निराशाजनक झाली होती, म्हणून केतनने वाट बदलली होती आणि आता तो ज्या शहरात हजर झाला होता ते अगदी पुण्यासारखंच वाटत होतं. कदाचित् पुणं असेलही. चारी बाजूंनी सिंहगड, पर्वती, लॉ कॉलेज, गणेशखिंड टेकड्या तर होत्याच, शहर दुभागणारी नदीही होती. प्रत्यक्षात शहराचं नाव काय होतं त्याला माहीत नव्हतं. ज्याला तो लकडीपूल म्हणून ओळखत होता (इथे तो खरोखरच लाकडी कठड्याचा होता), त्या पुलाच्या कोपऱ्यावर उभा राहून तो रस्त्यावरची वर्दळ पाहात होता.

आधी फरक जाणवला तो इमारतीतला. दोन मजल्यांच्यावर एकही उंच नव्हती. सर्व इमारती घडीव दगडांच्या होत्या. कौलारू छपरं होती. सिमेंट, काँक्रीटचा वापर

दिसत नव्हता. दुकानांची शटर्सही लाकडी फळ्यांची होती. पोलादाचा वापरही क्वचितच दिसत होता. खांबावरून दिवे होते; पण ते गॅसचे होते का सोडियमचे होते का मर्क्युरीचे होते, समजायला मार्ग नव्हता. संध्याकाळच्या तिरकस उन्हाने रस्ता उजळला होता.

मग त्याचं लक्ष वाहनांकडे गेलं. काही उघड उघड सार्वजनिक होती; पण त्याच्या अनुभवातल्या लाल, उंच बसशी त्यांचं काहीही साम्य नव्हतं. ती वाहनं म्हणजे बैठ्या जाड चाकांवरचे उघडे प्लॅटफॉर्म होते. दोन रांगांनी खुर्च्या होत्या, ऊन, पाऊस यांच्यापासून बचावासाठी वर ताडपत्री होती. खुर्च्यांवरून आरामात बसलेले लोक पंधरा किंवा वीस मैल वेगाने प्रवास करीत होते. कंडक्टर, घंटा, तिकीट, बॉक्स काही दिसत नव्हतं. अर्थात काहीतरी पद्धत असेलच; पण त्याला ती उमजत नव्हती.

पण त्या लोकांचे कपडे ! खाली धोतर किंवा लुंगीसारखा पायघोळ (रंगीत, क्वचित रेशमी, क्वचित जरीचाही) कपडा, खांद्याभोवती खाली सारखं घेतलेलं एक वस्त्र ज्यावर नक्षीदार कशीदाकाम केलेलं दिसत होतं, डोक्यावर अर्धवट मारवाडी – अर्धवट पंजाबी असा वाटणारा तुरेदार फेटा... बहुतेक सर्वांना झुपकेदार मिशा होत्या...आणि स्त्रिया? त्या कशा दिसत नव्हत्या? पुण्यातला हा जिमखाना चौक संध्याकाळी स्त्रियांनी गजबजून गेलेला असायचा... सर्व रस्त्यांवरून एकही स्त्री कशी दिसत नव्हती?

लांबवरून काहीतरी गलका कानावर आला. पुलाच्या पलीकडून कसली तरी मिरवणूक येत होती... लोकांच्या हातात उंच उंच काठ्या होत्या, वरती रंगीबेरंगी ध्वजपताका होत्या... ध्वजपताका लोक मोठ्या उत्साहाने नाचवीत होते... काहीतरी घोषणा देण्यात येत होती; पण ती झांजांचा खणखणाट, चर्मवाद्यांचा गंभीर घोष, तुताऱ्यांचे उंच उंच सूर यात गडप होत होती. त्याच्या आसपासचे लोक एव्हाना रस्त्यांच्या कडेला होत होते. रस्ता मोकळा झाला होता. अश्वारूढ रक्षकांचा एक ताफा घोड्याच्या टापांचे आवाज करीत रस्त्यावरून गेला. त्यांच्या खांद्यावर उंच भाले होते, कमरेला चामड्याच्या पट्ट्यात कसली तरी हत्यारं होती.

मिरवणूक सरकत सरकत पुढे पुढे येत होती. पुढच्या भागातले लोक बेभान होऊन नाचत होते, ओरडत होते. ''वा रो !'' ''वा रो!'' आता त्याला तो शब्द ऐकू आला; पण समजला मात्र नाही. मिरवणुकीच्या मध्यभागी रथासारख्या एका वाहनावर उंच जागी एका सिंहासनासाख्या आसनावर एक जाडजूड मध्यमवयीन गृहस्थ बसले

होते. स्वसंतुष्ट, आढ्यताखोर, घमेंडखोर, गर्विष्ठ नजर सर्वत्र फिरत होती. मध्येच त्यांनी एकदा वाकून समोरच्या पात्रात हात घातला; मूठभर चकचकती नाणी खाली फेकली... त्यांच्यासाठी लोकांच्या एकमेकांवर उड्या पडल्या. मिरवणूक सावकाश सावकाश पुढे गेली. ''वा रो !'' ''वा रो !''

हा कोण होता? नगराधिपती असेल, एखादा सुभेदार असेल, एखादा मंत्री असेल; सर्वेसर्वा सत्ता हाती वागवणारा होता खास. अशी ही संपूर्ण पुरुषाधिष्ठित संस्कृती इथे आकारली होती. मध्ययुगीन समाजव्यवस्था वाटत होती. व्यक्तिस्वातंत्र्य कितपत असेल याची त्याला शंकाच होती... आणि स्त्रियांच्या मुक्त सहवासास सरावलेल्या त्याच्या मनाला आणि जिवाला इथे चैन पडणं शक्यच नव्हतं.

ही जागा त्याच्यासाठी नव्हती.

चला ! पाऊल उचला !

✦

## दोन

केतन आणि विद्या. तो प्राध्यापक, ती डॉक्टर. दोघांनी आपापली आयुष्यं इतकी जमवून घेतली होती की मतभेदाचा, वादाचा, मी-तूचा कधी प्रश्नच आला नव्हता. तो जरासा अबोल, गंभीर स्वभावाचा, जरासा अंतर्मुख, बाह्यत: संयम कधीही न सोडणारा. विद्या जराशी अवखळ, स्वत:चं वय विसरून सर्वांच्यात मिसळणारी, बहुश्रुत, वाचन-चित्रकला-संगीत-छायाचित्रण-निसर्गभ्रमण या सर्वांत स्वारस्य असणारी, आयुष्यावर जिवापाड प्रेम करणारी...

हॉस्पिटलमधून स्कूटरवरून ती परत येत होती. बैलगाडीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या बसची स्कूटरला धडक बसली होती. मृत्यू अतिशय भीषण स्वरूपात तिच्या भेटीला आला होता. क्षण क्षण उत्कटतेने जगणारी विद्या जीवनाची रेषा पार करून गेली होती. पुन्हा ती दिसणार नव्हती. तिचं खळाळणारं हास्य कानावर येणार नव्हतं. तिच्या घाईगर्दीच्या हालचालींनी घरात हलचल माजणार नव्हती.

घरात शांतता होती. स्मशानशांतता.

सोबतीसाठी आलेले नातेवाईक-सहकारी-मित्र चार दिवस होते; मग ते गेले. केतन ब्लॉकमध्ये एकटा राहिला. हे असं का घडावं? त्याला त्या घटनेमागचं तर्कशास्त्र समजत नव्हतं. ती त्याला असह्य होत होती. तो ती घटना स्वीकारू शकत नव्हता.

जग जर असं सुईच्या अग्रावर तोललेलं असेल, एका अंगास स्वर्ग आणि दुसऱ्या अंगास नरकयातना इतकी तीव्र विभागणी असेल, तर मग कशाचा भरवसा होता? काहीही होऊ शकत होतं... तुमच्या महत्त्वाकांक्षेला, तुमच्या प्रयत्नाला, तुमच्या बुद्धिमत्तेला काहीही किंमत नव्हती.

हे जग केवळ निरर्थकच नाही, तर तर्कदुष्ट होतं.

आता तो पन्नास विद्यार्थ्यांसमोर उभा राहून त्यांना काय शिकवणार? जगाच्या न्यायीपणावर, तर्कशुद्धतेवर, नीती-अनीतीच्या कल्पनांवर त्याचाच विश्वास नव्हता; तर तो त्यांना काय, कसं सांगणार? ढोंगीपणाची ती सीमा झाली असती. कटुता शक्य तेवढी टाळून त्याने नोकरीचा राजीनामा दिला.

प्रकृती खालावली. खप्पड चेहऱ्यात डोळे मोठे दिसत होते. त्या मोठ्या डोळ्यांतून एक दुखावलेला, गोंधळलेला, भुकेलेला आत्मा बाहेर डोकावून पाहात होता. किती ठिकाणी तो गेला असेल? त्याला गणतीच नव्हती. तू काय शोधतो आहेस? विचारलं असतं तर त्याला उत्तरच देता आलं नसतं-कारण त्याचं त्यालाच माहीत नव्हतं.

विद्याचा अपघात हा जसा एक अनाकलनीय योगायोग, तशी बुवांची भेट ही सुद्धा एक अनाकलनीय योगायोगच होता. गाठ पडली ही महत्त्वाची गोष्ट होती.

बुवांच्यात असं विशेष काय होतं की त्याचा आजवरचा सारा संयम ढासळला, अंतर्यामात खदखदत असलेलं शोक-वियोग-विफलता-राग-असहायता यांचं जहरी खदखदतं मिश्रण बाहेर फेकलं गेलं? कितीतरी वेळ तो बोलत होता. शेवटी डोळे घट्ट मिटून मान खाली घालून तो बसून राहिला. शरीराला, तसाच मनाला थकवा आला होता.

कितीतरी वेळ खोलीत शांतता होती. मग बुवा म्हणाले,

''केतन, वर पाहा -माझ्याकडे पाहा -नजरेला नजर दे.''

त्याची मान सावकाश वर आली.

''तुला या जगाचा खरा खरा वीट आला आहे? या जगाबद्दल तुला आता काडीचीही आसक्ती राहिली नाही? समज, तुला संधी मिळाली, या जगाचा त्याग करायची तुझी तयारी आहे?''

प्रश्न आणि त्याची दिशा, सर्वच अनपेक्षित होतं. त्याचं मन आणि बुद्धी एकदम भानावर आली. पण बुवा म्हणत होते ते सर्व खरं होतं. त्याला वीट आला होता. मनात आसक्ती नव्हती; उलट घृणा होती.

''हो.'' तो शांतपणे म्हणाला,

''केतन, आपल्या खऱ्या इच्छा आपल्याला स्वत:लाही कळत नाहीत. मन आणि शरीर दोघांचा सतत लपंडाव चाललेला असतो.. एक दुसऱ्याला सारखं फसवत असतं... पण मला वाटतं, तू खरं बोलतो आहेस. निदान तुझ्या कुवतीप्रमाणे तू प्रांजळ आहेस.. आता मी काय सांगतो ते नीट ऐक... केतन, हे काही एकच एकमेवाद्वितीय जग नाही... मनात आणशील तेव्हा तू या जगाचा त्याग करू शकतोस, दुसऱ्या जगात पदार्पण करू शकतोस... कोणास ठाऊक ते कसं असेल ते? मागासलेलं असेल, पुढारलेलं असेल, वेगळ्या रीतीरिवाजांचं असेल... पण एक नाही तर दुसरं... शोधत राहा.

केतन नवलाने बुवांकडे पाहात होता.

''चुटकी वाजवण्याइतकं सोपं आहे हे केतन; पण सगळ्यांनाच जमत नाही. बहुतेकांना जमतच नाही... अज्ञानाची भीती असते... आहे हे आयुष्य कितीही कठीण असलं तरी त्याची खात्री असते... ते सोडून अंधारात झेप घ्यायची? वर-वर उद्वेगाचा कितीही आव आणला तरी जीव आतून घाबरत असतो. या जीवनाला जोडलेले पाश इथेच जखडून ठेवतात... तळमळ अशा अवस्थेला पोहोचली पाहिजे की आता क्षणभरात सुटका झाली नाही तर मृत्यूच ओढवेल अशी मनाची खात्री हवी. तरच शरीर आणि मन हे स्थित्यंतर करू शकतात. आता सांग, आहेस का तयार?''

केतनच्या डोळ्यांत एक नवी चकाकी आली होती.

''हो-हो-मी तयार आहे.''

बुवांनी त्याला समोर उभा केला. हाताच्या आणि मानेच्या काही हालचाली सांगितल्या आणि कानात एक शब्द उच्चारला.

''बस? एवढंच?'' केतन नवलाने, अविश्वासाने म्हणाला.

''हो, एवढंच. तुला हवं ते जग निवड. सुरुवातीची वेळ जरा कठीण आहे. कारण या जगात तुझी मुळं रुजली आहेत. पण मग मनात आणलंस की कोठेही जाऊ शकतोस. शक्यता असंख्य आहेत... पावला-पावलावर फाटे फुटत असतात. जा ! घे झेप ! पाऊल चालतं ठेव ! जा !''

त्यांच्या सोसायटीच्या मागेच एक लहानशी टेकडी होती. टेकडीवर मारुतीचं देऊळ होतं, पिंपळ, निलगिरी, साग, चिंच, आंबा, वड, लिंबू यांची संमिश्र झाडी होती. संध्याकाळी वृद्धांची आणि अंधारानंतर प्रणयी युगुलांची ती आवडती जागा होती.

दिवसरात्रीच्या सांध्याची वेळ होती. केतन त्या लहानशा टेकडीवर उभा होता. त्याच्या ब्लॉकच्या खिडक्या आणि बाल्कनी तिथून त्याला दिसत होत्या. मनासमोर क्षणभर विद्याची लोभसवाणी आकृती तरळली आणि काळजात विलक्षण कळ उठली. त्याच्या मनात आता शंका राहिली नव्हती. तो तयार होता.

त्याने हाताची, मानेची ती हालचाल केली, तो शब्द उच्चारला.

डोळ्यांसमोर क्षणमात्र लखलखाट झाला; मग गुडुप अंधार. कानात विजेच्या कडकडाटासारखा एक आवाज घुसला, मग शांतता. काहीही नव्हतं. संवेदनाच नव्हती. भोवती हवा नाही, पायाखाली आधार नाही –पण ही अवस्था क्षणमात्रच टिकली असेल. प्रकाश आणि गंध आणि स्पर्श आणि चेतना लाटालाटांच्या भरतीने आली. त्याने डोळे उघडले. इतका पारदर्शक प्रकाश ! इतकी ताजी सुगंधित हवा ! मग त्याची नजर सर्वत्र गेली. तो एका बोडक्या टेकडीवर उभा होता. समोरची कॉलनी गेली होती. त्याचं अपार्टमेंट गेलं होतं. टेकडीवरून खाली उतरत गेलेला वळणांचा डांबरी रस्ता गेला होता. लहान–मोठ्या उतारांची जमीन पार नदीच्या काठापर्यंत गेली होती. नदीवर पूल नव्हते. नदीच्या किनाऱ्यावर शहर नव्हतं. कुडाची गवताने शाकारलेली काही काही बसकी घरं होती. बाकी काही नाही !

आता त्याला उमगलं–प्रत्यक्ष त्या क्षणापर्यंत त्याचा स्वत:चाही विश्वास बसला नव्हता. या परिपूर्ण स्थित्यंतराने मनाला एक झटका बसला. मागचं आयुष्य आता गेलं होतं. तिकडे परत जाणं नाही. त्या आयुष्यातल्या आठवणी या विश्ववाऱ्यावर फडफडत दूर–दूर चालल्या होत्या... तो आता 'इथे' आला होता. हे त्याचं गाव नव्हतं. हा त्याचा जमाना नव्हता. पण हीच प्रणाली का निवडली गेली होती? त्याच्याच मनात असं एखाद्या मध्ययुगीन, साध्याभोळ्या, अप्रगत, सोप्या संस्कृतीचं आकर्षण होतं का? तो या जगात सुखाने राहू शकेल का?

तो टेकडी उतरायला सुरुवात करणार तोच त्याच्या कानावर कोणाच्या तरी पावलांचा आवाज आला. नालांच्या वहाणा खडकावर आवाज करीत होत्या. टेकडीच्या मागच्या बाजूने चढून कोणीतरी वर येत होतं. त्याच्या छातीखाली धडधड त्याला जाणवली. चढून आलेला माणूस माथ्यावर आला. केतनला पाहून त्यालाही नवल वाटलं असावं. तो तसाच थांबला. खांद्यापर्यंत वाढलेले केस, किंचित कुरळ्या केसांची पण नीटस दाढी, खाली वाकलेल्या मिशा. अकाली प्रौढ दिसत असला तरी तो केतनच्याच वयाचा वाटत होता. सततच्या श्रमाने खांद्यात

एक उभारी, रुंदपणा आला होता. पण ते डोळे ! ते नाक ! ती कपाळपट्टी!' तो त्याचाच चेहरा होता. या जगातला हा केतनचा अवतार होता... त्या दोघांनी इथे एकत्र येणं हाही एक योगायोग होता का? का ही भेट अपरिहार्यच होती? ते दोघं एकमेकांकडे पाहात उभे होते.

मनातल्या मनात केतनने ही भेट अशी रंगवली. ते दोघं जवळ येतात, एकमेकांचं उत्सुकतेनं निरीक्षण करतात. केतन म्हणतो,

–कमाल आहे ! आपण अगदी जुळ्या भावांसारखे आहोत, नाही !

–आपण जुळे भाऊ नाही आहोत– त्यापेक्षाही जवळ आहोत.

–तोच चेहरा, तेच डोळे, तीच जिवणी ! तुझे केस जरा छाटले तर तुझ्या–माझ्यात काहीच वेगळेपणा राहणार नाही. मग आपण जुळे भाऊ–भाऊच नाही का?

–नाही. आपण त्यापेक्षाही जवळचे आहोत.

–ते कसं काय? नीट सांग तरी !

–आपण एकच आहोत. मी म्हणजे तू आहेस. तू म्हणजे मी आहे. एक आत्मा. तुझं नाव केतन आहे ना? वाटलंच मला आपण एकच आहोच. फक्त वेगवेगळ्या विश्वात वावरतो आहोत. जुळ्या भावांपेक्षाही जवळचे. आपल्यात फरक नाहीच.

पण हा संवाद काल्पनिक होता. प्रत्यक्षात यातले काहीच घडले नाही. तो माणूस केतनजवळ आला. केतनकडे त्याने वरपासून खालपर्यंत एक नवलाची नजर टाकली, मग मान किंचित हलवून तो आपल्या वाटेने निघाला. तो जात होता ! न थांबता ! एक शब्दही न बोलता !

''थांब !'' न राहवून केतन म्हणाला. तो माणूस थांबला. मान वळवून मागे पाहात म्हणाला, ''काय?'' (किती ओळखीचा आवाज!)

''खूप लांबवरून मी इथे आलो आहे.''

''लक्षात आलं. कपडे, बोलण्याची पद्धत, सगळं वेगळं आहे.''

खालच्या लहानशा गावाकडे बोट करीत केतन म्हणाला,

''तिथे काही कामधंदा मिळेल?''

''अं हं. दिवस कठीण आहेत.'' तो आपल्या वाटेने निघायची तयारी करीत होता. त्याला नवल, कुतूहल, जिज्ञासा कशी वाटत नव्हती? अनुभव आणि अपेक्षा इतक्या संमिश्र होत्या का? रोजच्या आखीव आयुष्याच्या चाकोरीबाहेर तो नजर उंचावूनसुद्धा पाहात नव्हता का?